# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## सन २००८-२००९ चा सुधारित अर्थसंकल्प व २००९-२०१० च्या अर्थसंकल्पावरील संक्षिप्त टिपणी.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या कलम ७५(२) ( f ) मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे

१) परिरक्षण (Maintenance)

२) विकास (Development)

३) स्वतंत्र प्रकल्प/योजना/सहयोग कार्यक्रम अनुदाने
(Independent Project or Scheme or Collaborative Programme Grants)

या तीन भागामध्ये अर्थसंकल्प तयार करण्यात आलेला आहे. या व्यतिरिक्त लेखा संहितेमधील तरतुदीनुसार 'कर्ज अग्रिम आणि निक्षेप' ह्या बाबी दर्शविणारे स्वतंत्र परिशिष्ट जोडलेले आहे.

# भाग-१ : परिरक्षण (Part I : Maintenance)

## वेतन

मान्यता प्राप्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी २००८-०९ या वर्षामध्ये रुपये १२ कोटी ५८ लक्ष ९३ हजार ५८४ इतके अनुदान शासनाकडून मिळणार आहे. २००९-१० या अर्थसंकल्पीय वर्षामध्ये १२ कोटी ९४ लक्ष ४१ हजार ६२२ इतक्या अनुदान प्राप्तीचा अंदाज करण्यात आला आहे. पदोन्नती, वार्षिक वेतनवाढ, वाढणारा महाभाई भत्ता इत्यादीमुळे या वाढीव अनुदानाचा समावेश या अर्थसंकल्पात करण्यात आला आहे.

## परीक्षा

परीक्षा शुल्कापासून २००८-०९ या वर्षअखेरपर्यंत रुपये ९ कोटी २८ लक्ष इतके शुल्क प्राप्त होईल असा अंदाज आहे. त्याचप्रमाणे २००९-१० या अर्थसंकल्पीय वर्षामध्ये ८ कोटी ४१ लक्ष इतक्या प्राप्तीचा अंदाज करण्यात आला आहे. परीक्षा संचालनासाठी २००८-०९ या वर्षामध्ये ५ कोटी २६ लक्ष ५० हजार रुपये इतका खर्च होईल तसेच, २००९-१० या अर्थसंकल्पीय वर्षामध्ये ६ कोटी ५६ लक्ष ६५ हजार इतक्या खर्चाचा अंदाज करण्यात आला आहे.

## पदव्युत्तर शैक्षणिक विभाग

पदव्युत्तर शैक्षणिक विभागास विद्यार्थ्यांकडून २००८-०९ या वर्षामध्ये रुपये २ कोटी ३५ लक्ष २५ हजार ६६१ आणि अर्थसंकल्पीय वर्षात रुपये १ कोटी ६० लक्ष २१ हजार २०० इतके शुल्क प्राप्तीचा अंदाज करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे या शैक्षणिक विभागासाठी २००८-०९ या वर्षासाठी रुपये ७३ लक्ष ४१ हजार ५५० आणि अर्थसंकल्पीय वर्षात रुपये ७५ लक्ष ७९ हजार ७५० इतका खर्च होईल असा अंदाज करण्यात आला आहे.

## विद्यापीठ ग्रंथालय

विद्यापीठ ग्रंथालयापासून अर्थसंकल्पीय वर्षात रुपये १ लक्ष २ हजार १०० इतक्या उत्पन्नाचा अंदाज करण्यात आला आहे. इतके कमी उत्पन्न अपेक्षित असतांनासुद्धा पाक्षिके, नियतकालीके तसेच प्रशासकीय खर्चासाठी रुपये २२ लक्ष ५५ हजार एवढी तरतुद करण्यात आली आहे. तसेच पुस्तके, उपकरणे, उपस्कर मिळून ग्रंथालयासाठी एकूण रुपये ३१ लक्ष १८ हजार एवढी तरतुद करण्यात आली आहे. विद्यापीठ ग्रंथालय समृध्द व्हावे हा त्यामागील प्रमुख उद्देश आहे.

## शारीरिक शिक्षण व रंजन

शारीरिक शिक्षण व रंजन उपक्रमामार्फत २००८-०९ या वर्षामध्ये रुपये ७२ लक्ष ६८ हजार ३०० आणि अर्थसंकल्पीय वर्षात रुपये ८६ लक्ष ०३ हजार इतक्या शुल्काचा अंदाज करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे विविध खेळ व स्पर्धा आयोजन करण्यासाठी २००८-०९ या वर्षात रुपये ७० लक्ष ९७ हजार आणि अर्थसंकल्पीय वर्षात रुपये ९९ लक्ष ७४ हजार ७०० एवढ्या खर्चाचा अंदाज करण्यात आला आहे.

## सर्व सामान्य सेवा व प्रशासकीय व्यय

वेतन, परीक्षा संचलन, पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, विद्यापीठ ग्रंथालय तसेच शारीरिक शिक्षण व रंजन कार्यक्रमावर होणारा खर्च वगळता जाहीरात, वीज, पाणीपुरवठा, विधी शुल्क, मुद्रण व लेखन सामग्री, टपाल,तार, दुरध्वनी, प्रवास खर्च, विमा, उपकरणांची देखभाल संपत्तीवरील घसारा तरतुद, निकाय निधीला अंशदान तसेच इतर किरकोळ प्रशासकीय खर्चासाठी २००८-०९ या वर्षामध्ये रुपये ८ कोटी २५ लक्ष ५६ हजार ०१७ एवढा आणि अर्थसंकल्पीय वर्षात रुपये ८ कोटी ९८ लक्ष ३९ हजार १३५ एवढ्या खर्चाचा अंदाज करण्यात आला आहे.

## भाग-२ : विकास (Part II : Development)

या भागामध्ये केंद्र आणि राज्य शासन, विद्यापीठ अनुदान आयोग आणि इतर वित्तीय संस्थांकडून प्राप्त झालेले अनुदान आणि विद्यापीठाच्या साधारण निधीमधून, विविध विकास कामाकरिता जसे शैक्षणिक विभागाकरिता इमारती, उपकरणे, उपस्कर,पुस्तके तसेच प्रशासकीय विभागांकरिता उपकरणे, उपस्कर आणि इतर विकास कामांसाठी होणाऱ्या प्राप्ती आणि खर्चाच्या तरतूदीचा समावेश केला जातो.

विद्यापीठाच्या साधारण निधीमधून ग्रंथालयासाठी उपस्कर, उपकरणे तसेच प्रशासकीय आणि शैक्षणिक विभागांसाठी उपकरणे, उपस्कर, विविध बांधकामे आणि उद्यान निर्मितीकरिता २००८-२००९ या वर्षामध्ये रुपये ३ कोटी ८८ हजार १९२ एवढी सुधारित तरतूद करण्यात आलेली आहे. २००९-२०१० या अर्थसंकल्पीय वर्षामध्ये रुपये ६ कोटी ४५ लक्ष ४२ हजार ७२४ एवढी तरतूद करण्यात आलेली आहे.

### निकाय निधी

विद्यापीठाने निकाय निधी (कॉर्पस फंड) उभारलेला असून २००७-०८ या वर्षामध्ये रुपये २४ लक्ष ६१ हजार ०११ एवढा निकाय निधी जमा झालेला आहे. २००८-०९ या वर्षामध्ये या फंडामध्ये रुपये ३४ लक्ष इतका निधी जमा होईल, तसेच २००९-१० या अर्थसंकल्पीय वर्षामध्ये रुपये १० लक्षची वाढ अपेक्षीत असून रुपये ३४ लक्ष इतका निधी जमा होईल असा अंदाज करण्यात आला आहे.

## भाग-३ : स्वतंत्र प्रकल्प किंवा योजना किंवा सहयोग कार्यक्रम अनुदाने

### (Part III : Independent Project or Scheme or Collaborative Programme Grants)

विद्यापीठाच्या विविध पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील संशोधक शिक्षकांनी विद्यापीठ अनुदान आयोग, संचालक, विज्ञान व तंत्रज्ञान, केंद्र सरकार व तत्सम वित्तीय संस्थांकडे सादर करण्यात आलेल्या विविध संशोधन प्रकल्पाच्या माध्यमातून तसेच विद्यार्थ्यांना द्यावयाच्या शिष्यवृत्तीसाठी २००८-०९ या वर्षामध्ये रुपये १ कोटी ७८ लक्ष ४७ हजार १०३ इतके अनुदान अपेक्षीत असून २००९-१० या अर्थसंकल्पीय वर्षामध्ये १ कोटी २० लक्ष ४ हजार ५०० एवढ्या अनुदान प्राप्तीचा अंदाज आहे. संशोधन प्रकल्पाच्या माध्यमातून अनुदान प्राप्त होत असल्यामुळे विद्यापीठाचा शैक्षणिक विकास व संशोधन कार्यास मोठा हातभार लागणार आहे.

# अर्थसंकल्पाची वैशिष्ट्ये

**प्रस्तुत अर्थसंकल्पाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील.**

१) विविध खेळ, क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने अर्थसंकल्पीय वर्षात रुपये ९९ लक्ष ७४ हजार ७०० इतकी तरतुद करण्यात आली आहे.

२) ग्रंथालयाचे महत्व लक्षात घेता, संशोधकांना तसेच विद्यार्थ्यांना अत्याधुनिक ग्रंथालयीन सोयी उपलब्ध होण्याचे दृष्टीने साधारण निधीमधून पुस्तके व नियतकालीकांसाठी अर्थसंकल्पीय वर्षात रुपये ३५ लक्षची तरतुद करण्यात आली आहे

३) विद्यापीठाचे साधारण निधीमधून शैक्षणिक विभागांसाठी आवश्यक असणारे उपस्कर व उपकरणे खरेदीसाठी अर्थसंकल्पीय वर्षात रुपये ४९ लक्ष ३८ हजार ८४४ एवढी तरतुद करण्यात आली आहे.

४) विद्यापीठात शिक्षण, संशोधन, विकास आणि विस्तार उपक्रमांना चालना देण्याच्या दृष्टीने अर्थसंकल्पीय वर्षात रुपये ८ लक्ष ची तरतुद करण्यात आलेली आहे.

५) Best Practices in University या शिर्षांतर्गत अर्थसंकल्पीय वर्षात रुपये ५० लक्ष तरतुद करण्यात आली आहे.

६) विद्यापीठाद्वारे संलग्नित महाविद्यालयातील आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेल्या व विविध परीक्षांमध्ये उत्कृष्ठ गुण मिळविलेल्या आणि विद्यापीठाच्या इतर विविध उपक्रमांमध्ये कामगिरी बजावलेल्या विद्यार्थ्यांसाठी प्रदान करण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीअंतर्गत अर्थसंकल्पीय वर्षात रुपये ३ लक्ष एवढी तरतुद करण्यात आलेली आहे.

७) विद्यार्थी कल्याण निधी अंतर्गत संत गाडगे बाबा विद्याधन योजनेकरिता अर्थसंकल्पीय वर्षात रुपये १ लक्ष ७० हजाराची तरतुद करण्यात आलेली आहे.

८) सन २००७-०९ या अर्थसंकल्पीय वर्षात गुंतवणुक समितीने वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शन व निर्देशाप्रमाणे गुंतवणुकी करण्यात आल्यामुळे विद्यापीठाला रुपये ८० लक्ष ५६ हजार ०६३ एवढे व्याज प्राप्त झाले हे येथे आवर्जुन नमुद करण्यात येत आहे व अर्थसंकल्पीय वर्षात रुपये १ कोटी ७५ लक्ष एवढे व्याज मिळेल असा अंदाज करण्यात आला आहे.

# आर्थिक स्थिती

विद्यापीठाचा २००७-२००८ चे प्रत्यक्ष २००८-२००९ चे सुधारित अंदाज आणि २००९-२०१० चा 'अर्थसंकल्प एक दृष्टीक्षेप' चे अवलोकन केल्यास असे आढळून येईल की,

विद्यापीठास स्वतःच्या स्त्रोतांपासून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नामधून केवळ परिरक्षणासाठी (Maintenance) आणि दैनंदिन प्रशासन चालविण्यासाठी अंतर्गत खर्च भागविण्याइतपत निधी उपलब्ध होतो. विद्यापीठाच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या इमारती, उपस्कर, शैक्षणिक विभागांसाठी आवश्यक असणारी उपकरणे, ग्रंथालयासाठी पुस्तके, परीसर विकास कामांसाठी आवश्यक असणारा निधी विद्यापीठाच्या संचितीमधून करावा लागतो.

उत्पन्न वाढविण्याचा एक भाग म्हणून संशोधनासाठी आर्थिक सहाय्य देणाऱ्या विविध संस्थांकडे विद्यापीठाद्वारे विविध संशोधन प्रकल्प सादर करण्यात आले आहेत. या प्रकल्पाच्या माध्यमातून संशोधनासाठी आवश्यक असणारी उपकरणे तसेच अनुषंगीक साहित्य खरेदी करण्यात येत आहेत. त्यामुळे विद्यापीठ साधारण निधीवरील खर्चाचा भार कमी करण्यास मदत होईल.

विद्यापीठाची विकसनशिल अवस्था लक्षात घेता उद्दीष्ट्ये प्राप्त करण्यासाठी विकास कामांवर खर्च करणे आवश्यक आहे. वर नमुद करण्यात आलेल्या वित्तीय संस्थांकडून पुरेसे अनुदान प्राप्त झाल्यास, अर्थसंकल्पामध्ये येणारी संभाव्य तूट कमी होण्यास निश्चितच हातभार लागेल असा विश्वास आहे.

वर नमुद केल्याप्रमाणे केंद्र आणि राज्य शासन, विद्यापीठ अनुदान आयोग, विविध संशोधन संस्थांकडून जास्तीत जास्त अनुदान प्राप्त करुन विद्यापीठाच्या साधारण निधीवर पडणारा आर्थिक भार कमी करण्याचा विद्यापीठाद्वारे सतत प्रयत्न करण्यात येत आहे.